# विश्वसंत तुकोबांची तपोभूमी

## श्रीक्षेत्र भामचंद्र - भंडारा डोंगर वाचवण्यासाठी विनम्र आवाहन !

सज्जन मित्रहो ! विठ्ठलाचा आत्म-साक्षात्कार संत तुकोबांना ज्या देहुजवळील भंडारा-भामचंद्र डोंगरात झाला, ती पावन भूमी फोडून, पंढरपुरात आषाढी कार्तीकीला विठ्ठलाची पुजा करण्याचा व सत्तेत राहण्याचा नैतिक अधिकार माननिय मुख्यमंत्री यांना उरला नाही. महाराष्ट्र ही संतांची संपन्न जन्म कर्मभूमी आहे. या संतभूमीला भागवत धर्माची अर्थात वारकरी सांप्रदायाची उज्ज्वल परंपरा लाभली आहे. विश्व मानवतेला गवसणी घालणारी वैश्विक प्रार्थना येथेच मराठी भाषेत प्रथमतः उद्घोषित झाली. योगियांचे शिरोमणी ज्ञानेश्वर माऊलीनी इथे विश्वधर्म मंदिराचा पाया रचला आणि जगद्गुरु तुकाराम महाराज या मंदिराचे कळसस्थानी विराजमान झाले.

सातशे वर्षापूर्वी सुरु झालेली वारकरी धर्माची उज्वल परंपरा, आज जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचते आहे. जगभरातल्या मानवतेलाच नव्हेतर समग्र प्राणी मात्रांच्या ऐक्यासाठी प्रार्थना करणारे हे समताप्रधान तत्त्वज्ञान म्हणूनच सर्वांना साद घालीत आहे. जीवनातील अंतिम ध्येय्य आणि त्यासाठी अनुकरणीय अध्यात्मिक वाटचाल, याचे सुलभ-सोपे विवेचन याच धर्मात सांगण्यात आले आहे. ‘हे विश्वची माझे घर’, ‘किंबहुना चराचर आपणची जाहला’ अशी अनुभूती देणारे हे तत्त्वज्ञान आहे. ज्ञानाईची ‘ज्ञानेश्वरी’, तुकोबांची ‘अभंग गाथा’ व नाथांचे ‘भागवत’ ही या धर्माची प्रस्थानत्रयी आहे. गोरोबा, चोखोबा, निळोबा, सावंता माळी, जनाबाई, कान्होपात्रा इत्यादी संत मांदियाळीतील अभंग रचनांनी त्यात मोलाची भर घातली. ‘‘नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।’’ हे अभंग ब्रीद संत नामदेवांनी भारतभर साकार केले. संत बहिणाबाईंनी या धर्म मंदिराचे यथार्थ वर्णन केले आहे.

इंद्रायणीकाठी ज्ञानदेवादी भावंडांची बालक्रीडा भूमी सिद्धबेट-आळंदी, आणि देहू हे संत तुकाराम महाराजांचे जन्मस्थान, यामुळे या भोवतालच्या परिसराला वारकरी धर्मात अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले. ज्ञानदेवांची समाधी श्रीक्षेत्र आळंदी आणि जगद्गुरु तुकाराम महाराजांनी ज्या देहु जवळ भंडारा-भामचंद्र-घोऱ्हावडेश्वर डोंगर या ठिकाणी साधना केली असा हा पुण्य पावन परिसर. आपले सर्वांचे भाग्य थोर म्हणून नित्य-नियमाची वारी, संत तुकाराम महाराज बीज आणि प्रस्थान सोहळ्याच्या निमित्ताने या पुण्यभूमीचे दर्शन घडते. त्यासाठी वारकरी धर्माचे उगमस्थान या प्रकारचे या परिसराचे महत्त्व सांभाळून या धर्माच्या वाढीसाठी अनुकूल असे या परिसराचे संवर्धन करणे ही आपली सर्वांची प्रथम जबाबदारी आहे.

एखादी श्रेष्ठ संस्कृती - परंपरा वा संतांचे तपोभूमी तिर्थस्थल निर्माण होण्यासाठी हजारो वर्षाचा कालखंड लागतो परंतु त्याचे अस्तित्व संपुष्टात आणण्यासाठी भौतिक चंगळवाद्यांना अल्पसा काल सुध्दा पुरेसा ठरतो म्हणून एकदाका अशी उर्जा - प्रेरणा स्थाने नष्ट झाली तर मानव आदर्शहिन पशुसमान वनून त्याचे नैतिक अध:पतन होते ते होऊ नये यासाठीच संत तुकोवांच्या तपोभूमी स्थळांच्या जतनास्तव हा सत् आणि असत् मधील संघर्ष शासनाबरोबर चालला आहे. प्राचिन इतिहास लेणी संपन्न, संतभूमीची पार्श्वभूमी लाभलेला हा सर्व प्रदेश म्हणून येथील संत जीवनाशी निगडीत इतिहासाच्या खुणा जपणे आणि वारकरी विश्वधर्माच्या वाढीसाठी अनुकूल असे वातावरण या परिसरात कायम राखणे अत्यंत आवश्यक आहे.बदलत्या परिस्थितीत पुढील पिढीसाठी ऐतिहासिकव अध्यात्मिक हा वारसा संस्कृतिच्या अभ्यासासाठी गरजेचा आहे याची जाणीव ठेवणे शासनाचेच आद्य कर्तव्य ठरते.

आज २१ व्या शतकात विज्ञान युगाच्या प्रगतीबरोबर हा परिसर आमुलाग्र बदलतो आहे. शासनाच्या चुकिच्या औद्योगिक धोरणांमुळे या भागात नव-नवीन उद्योग उभारले जात आहेत. वैज्ञानिक प्रगती अनेकदा डोळे दिपून टाकणारी आणि आकर्षित वाटणारी अशीच ठरते. अशावेळी जुन्या प्राचीन व ऐतिहासिक वारसांचे संवर्धन गौण ठरताना दिसत आहे. इतकेच नाहीतर निसर्गाचीही विपरित हानी होत आहे. राज्यात व सर्व देशात अशा प्रकारचा विध्वंस समोर आला आहे. दीर्घकालीन नियोजनाचा अभाव आणि लोकशाहीतील श्रेय-वादाची राजकीय चढाओढ यामुळे याचे भान कुणालाही राहिलेले नाही. अनेक समस्या त्यातून निर्माण होतात तरीही त्याकडे योग्य वेळी लक्ष दिले जात नाही असा अनुभव येतो. इथे ‘राजा कालस्य कारणम् ।’! हे महाभारतातील वचन खरे ठरले आहे.

पुणे जिल्हा खेड व मावळ तालुक्याचा बराच मोठा भाग अशा प्रकारे औद्योगिकीकरणासाठी जाहिर झाला आहे, होत आहे. श्रीक्षेत्र भंडारा-भामचंद्र, आळंदी, चाकण, तळेगाव या सांस्कृतिक व अध्यात्मिक वारसा असलेल्या परिसरात अनेक मोठ्या उद्योगांची उभारणी सुरु झाली आहे. परंपरेचा फार मोठा उज्ज्वल वारसा लाभलेल्या या परिसराची क्रुरपणाने मोडतोड करुन विटंबना चाललेली आहे.

विशेषतः भंडारा आणि भामचंद्र डोंगर व परिसरात हे संकट फार मोठे आहे. अगदी सुरवातीपासून संतभूमीसह निसर्गाची होणारी हानी थांबवणेसाठी याबाबतची वस्तुस्थिती मांडण्याचा प्रयत्न सातत्याने झाला आहे, होत आहे. शासन-राज्यकर्ते आणि भांडवलदार लाभार्थी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. यास्तव संतभूमी रक्षणार्थ संत तुकोबांचा अविष्कार असे वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा आदर्श सर्वांनी घेऊन, हा लढा व्यापक करण्याची गरज कालौघात निर्माण झाली आहे.

या संदर्भात लक्षात घेण्यासारखी महत्त्वाची बाब म्हणजे, कोल्हापूरचे श्री तुकयाभक्त - मधुसूदन पाटील महाराज वैयक्तिक पातळीवर समर्पितपणे गेली २५ वर्षे या विरोधात आवाज उठवीत आहेत. संतश्रेष्ठ तुकोबांची तपोभूमी परिसर संरक्षणासाठीच त्यांनी जणू इथे अधिष्ठाण मांडले आहे. संतभूमी विध्वंसक अमेरिकन 'डाऊ' केमिकल कंपनी विरोधात त्यांनी छेडलेल्या आंदोलनाला आपण सर्वांनी प्रकर्षाने पाठींबा दिला, परंतु आंदोलनाचा मुळ हेतू म्हणजे ''भंडारा-भामचंद्र मुक्ती संघर्ष'' हा होता तो पूर्ण सफल झाला नाही. मध्यतंर आम्ही शासनाच्या चुकीच्या धोरणा विरोधात लढाईसाठी कमी पडलो, आंदोलनातील आधारस्तंभ भंगले त्याचा परिणाम म्हणून आज तुकोबांचे हे पवित्र डोंगर खंडीत होत आहेत.

यासाठीच शासनाविरोधात पुन्हा एकदा ''भंडारा-भामचंद्र डोंगर बचाव अभियान'' आंदोलनाच्या या आवाहनाला जर आपण सर्वांनी वेळीच प्रतिसाद दिला नाही, तर... सह्याद्रीच्या कुशीतील निसर्ग संपन्न अशी संत तुकोबांची ही जागतिक अध्यात्मिक एकांतिक पवित्र ध्यान-साधना केंद्रे, ज्यांना प्राचीन ऐतिहासिक सांस्कृतिक पार्श्वभूमी लाभली, जीथे विश्वोध्दारक अभंगवाणी स्फूरली ती साक्षात्कार पवित्र अशी ही प्रेरणास्थाने खंडीत, बाधित नष्ट होण्यास वेळ लागणार नाही. खरेतर संतांचे पाईक म्हणविणाऱ्यांनी, या डोंगरातून तुकोबांनी शिवरायांना केलेल्या उपदेश प्रकरणातील पुढील अभंग वचनाचे थोडे अंतर्मुख होऊन चिंतन करावे.

''पाईकांनी पंथ चालविल्या वाटा । पारख्याचा सांठा मोडूनिया ॥'' असे घडण्याऐवजी आज, ''प्रसंगावाचूनी आणिती आविर्भाव । पाईक तो नांव मिरवी वायां ॥'' हेच वर्तमानात इथे घडत आहे, आणि त्यामुळे ''येथ काय कुणाचे गेले । ज्याचे त्याने अनहित केले ॥'' असे आमचेकडून होऊ नये, याबाबत पुढील पिढीने आम्हाला दूषण देवू नये, म्हणून मित्रहो !... अजूनही वेळ गेलेली नाही ! ''उठा भक्तहो चला सिद्ध व्हा ! गाडू राक्षसी बंड ॥ धर्मस्थळ मोडीती तयाला देऊ शासन दंड ! ॥'' हे मधुसूदन महाराजांचे वचन आपण या पुण्यभूमीसाठी सार्थ करुया. चलातर मग ! ''काळ भविष्यत् स्वाधिन करु । वर्तमान करणीने ॥'' यासाठी ''वीर विठ्ठलाचे गाडे । कलीकाळ पाया पडे ॥'' हि आपली स्वायत्तता आठवा...! मग भ्रष्ट शासन ही तर आम्हा पुढे शुल्लक बाब !....''आमुचीया बळापुढे हे किती बापुडे!....''

** जय तुकोबा ! **



** संतभूमी संरक्षक संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्य **

संतभूमी रक्षणार्थ केले आम्ही आवाहन सत्य ॥
ध्येयी आमुच्या एकनिष्ठ जे धन्य तेची अमर्त्य ॥ १ ॥... हा संदेश !
एक-एकाहुनि बळवंत मिळाले वैष्णव विर ॥
सम्यक्-क्रांती समतेस्तव जगी जिंकु आम्ही फकीर ॥ २ ॥... हा आत्म विश्वास !!
सर्वस्वांस अर्पिले रक्षितां श्रीसंतांची भूमी ॥
माय कुणाची व्याली सांगा खचविण्यास ती उर्मी ॥३ ॥... ही ध्येय्यवेडी जीद्द !!!

**प्रबोध :-एका सर्वोच्च समान ध्येयाने झपाटलेली माणसेच विजयाचे लक्ष लवकर गाठतात !! (एकल्याचा नोहे खेळ । म्हणवुनी मेळ मेळविला ॥ )**

--------------********------------

* *सुचना* :- हे पत्रक महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्रातुन प्रसारण करणेसाठी त्याचप्रमाणे संतवाङ्मयाचे अभ्यासक, चिंतक, प्रबोधक, प्रवचनकार, किर्तनकार यांना किर्तन, प्रवचन, व्याख्यानातून सातत्याने प्रबोधनासाठी *'संतभूमी संरक्षक संघर्ष समिती''* द्वारा भामचंद्र डोंगरातून प्रकाशीत... सज्जनहो ! आपणही हे आवाहन, ठराव व विरोधाभास छायाचित्र पत्रकाच्या हजारो झेरॉक्स प्रती काढून संत कार्यासाठी वाटाव्यात व इतर सर्व क्षेत्रातील सामाजिक संघटनेद्वाराही माननिय मुख्यमंत्री यांचेकडे ठराव पाठवावेत व जीवन धन्य करावे !

* प्रकाशक : *संतभूमी संरक्षक संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्य* दि.१६/०९/२०१७ * *लेखन - आनंद यात्रिक- ९४२०२२४३४१*

*** टिप :- या पत्रकासोबत आपल्या ग्रामपंचायत ठरावासाठी प्रत जोडत आहोत. आपला एक ठराव ऐतिहासिक ठरेल. !**

खालील वस्तुस्थितीदर्शक ठराव ग्रामपंचायतीच्या पत्रामध्ये अंतर्भूत करुन प्रत्येक ग्रामपंचायतीने संत तुकाराम महाराजांच्या प्रती असणाऱ्या भावना या ठरावामध्ये समाविष्ट करुन हा ठराव शासनाकडे पाठविण्यासाठी पक्षनिरपेक्षपणे सहकार्य करावे. हि विनंती.

''एकमेका साह्य करु । अवघे धरु सुपंथ।।'' संत तुकाराम महाराज.

* आवाहक *

** संतभूमी संरक्षक संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्य**

संपर्क व पत्रव्यवहारासाठी : मधुसूदन पाटील महाराज (७०८३७०५१७८)

भामचंद्र डोंगर, पोष्ट वासुली, तालुका खेड, जिल्हा पुणे-४१०५०१

(ठरावाची एक प्रत वरील पत्यावर पाठवावी).

---

## देहु जवळील श्रीक्षेत्र भामचंद्र व भंडारा डोंगर वाचवणेसाठी ग्रामपंचायत ठराव

दिनांक : / /२०१

**प्रति :- माननीय मुख्यमंत्री,**

महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांजकडे

**विषय :- जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकोबांची तपोभूमी भंडारा-भामचंद्र डोंगर संरक्षितक्षेत्र संदर्भातील ग्रामसभा ठरावाची अंमलबजावणी करणेबाबत...**

महोदय,

विश्ववंद्य संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या ध्यान चिंतनाने पावन झालेली देहू जवळील तपोभूमी श्रीक्षेत्र भामचंद्र व भंडारा डोंगर हे महाराष्ट्राचे भूषण असून सन १९६० च्या संसद विधिनियमावलीनुसार (पुरातत्त्व विभागात) संरक्षित असलेले हे क्षेत्र शासनाने एमआयडीसीसाठी अनधिकृतपणे भूसंपादीत करुन सदर डोंगर येथील एमआयडीसी, खाजगी हक्क सांगणारे धनिक राजकीय बिल्डरांच्याद्वारे उत्खनन व सपाटीकरणकरुन धोक्यात आणले आहेत. या संतभूमीच्या रक्षणासाठीच सन २००५ पासून सक्रिय लढा सुरु आहे. सन २००७-८ मध्ये आम्ही परकीय 'डाऊ' कंपनी विरोधी मोठे विद्रोही आंदोलन उभारुन ते यशस्वी केले. परंतु... 'डाऊ' विरोधी आंदोलनाचा बदला घ्यायचा म्हणून की काय शासनाने संत तुकोबांच्या तपोभूमी डोंगरांचा संरक्षित असलेला पायथा व परिसर क्रुरपणे फोडून विटंबना चालवली आहे आणि विकासाच्या नावे एमआयडीसी व व्यावसायिकांचे उद्योग येथे अवैधपणे चालू ठेवले आहेत. त्यामुळे या संतभूमी विध्वंसाबाबत खेड व मावळसह साऱ्या महाराष्ट्रभर भाविक वारकरी जनांमध्ये त्याचप्रमाणे निसर्ग पर्यावरण प्रेमी जागृत तरुणाई आणि संतप्रेमी वाङ्मय चिंतक इतिहास अभ्यासकांमध्ये याचा प्रचंड रोष असून शासनाविरोधात असंतोष निर्माण झाला आहे.

या बाबत सनदशिर मार्गाने गेली कित्येक वर्षे शासन दरबारी अनेक तक्रार, शेकडो निवेदने देऊन या संतभूमीसाठी प्राणांतिक संघर्ष भामचंद्र डोंगर तपोभूमीतील मधुसूदन पाटील महाराज अविश्रांतपणे करीत आहेत. त्यामुळे त्यांचे वास्तव्य मंदिरासह दस्तऐवज पेटवणे, प्राणांतिक हल्ला करणे, अपहरण करुन ठार मारण्याची धमकी देणे इत्यादी गुन्हे त्यांचे संतभूमी विरोधकांनी केले परंतु शासनाने संतभूमीची संवेदनशीलपणे कधीच दखल घेतली नाही. ज्या भूमीतून ''वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ॥''हा निसर्ग पर्यावरण रक्षणाचा प्रथम संदेश साऱ्या विश्वाला आपल्या अभंग वाणीतून तुकोबांनी दिला, त्यांना विठ्ठलाचा आत्मत्वाने साक्षात्कार जेथे झाला The Caves Temple of India(Estd.1880) ग्रंथामध्ये ब्रिटिश अभ्यासकांनी ही गुढ-भूमी म्हणून ज्याची नोंद केली असा जगप्रसिद्ध श्रीक्षेत्र भंडारा-भामचंद्र डोंगर व पायथा सुरुंग लावून प्रचंड यंत्रेद्वारा बेकायदेशीरपणे फोडणाऱ्या एमआयडीसी व्यावसायिक बिल्डर कंत्राटदारावर शासनाने आजपर्यंत कांहीच कायदेशीर कारवाई केली नाही ही गंभीर बाब निषेधार्य आहे.

''वन ग्राम योजनेला'' संत तुकारामांचे नाव देणाऱ्या, 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' हे तुकोबांचे ब्रीद वन विभागाद्वारे मिरवणाऱ्या शासनाने सह्याद्रीच्या **''इको सेन्सिटिव्ह झोन''** मधून हे डोंगर वगळणे हा शासनाच्या कथनी व करणीतील विरोधाभास आहे. विश्ववंद्य छत्रपती शिवरायांना त्यांच्या कल्याणकारी राजमुद्रेतुन बेदखल करुन त्यांना सिमीत करणाऱ्या व आपली प्रौढी मिरवणाऱ्या शासनाने प्रथम करणी व कथनीतील हा वरील विरोधाभास कायमचा मिटवून शिवरायांचे गुरु तुकोबारायांच्या तपोभूमीवरील अन्याय त्वरीत थांबवावा.

**विशेष नोंद घेण्यायोग्य बाबी  अ)** पुर्वीपासून सरकारी वनविभाग असणाऱ्या या दोन्ही डोंगरावर कांही खाजगी जागा आहे ती वनखात्याला जोडावी जेणे करुन डोंगराचे अखंड पावित्र्य जपता येईल असा येथील **वनपालाचा सन २००८ चा रिपोर्ट आहे. ब) सन १९६१ चा महाराष्ट्र प्राचीन स्मारक व पुराण वास्तूशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम १९६०** अन्वये अधिनियम अंतर्गत (संरक्षित क्षेत्रे) कलम ३ नुसार भंडारा व भामचंद्र डोंगर हे स्थळ संरक्षित क्षेत्र आहे. **क)** या ऐतिहासिक दोन्ही डोंगर स्थळाबाबत मधुसूदन महाराजांच्या मागणी व पाठपुराव्यानुसार **शासनाने सन २०११ ला "राज्य संरक्षित स्मारक"संदर्भित अधिसूचनाही काढली** परंतु या संरक्षीत क्षेत्रावर एमआयडीसी, राजकीय पुढारी, येथील खाजगी धनिक जमीनदार व्यावसायिक, ग्रामपंचायत, देहू संस्थान, भंडारा डोंगर दशमी समिती व ट्रस्ट यांनी संगनमताने स्वस्वार्थासाठी सोयीस्करपणे हरकती घेवून खोटे ठराव शासनाकडे पाठविले. शासनाने त्यांची योग्यायोग्य शहानिशा न करता उलट त्यांना सहानुभूती देवून अधिसूचनेतील संरक्षीत क्षेत्र निम्म्याहुन कमी केले अशाप्रकारे संतभूमीला धोका दिला व वारक-यांच्या श्रध्दा पायदळी तुडवून विश्वासघात केला. तेंव्हा या संतद्रोही हरकती व खोटे ठराव फेटाळून देऊन शासनाने (सांस्कृतिक विभागाने) जर या संतपीठाचे रक्षण केले नाही तर... तुकोबांच्या या तपोभूमी डोंगरांच्या अखंड जतनासाठी संपूर्ण महाराष्ट्रात वारकरी सांप्रदाय व संतप्रेमि संघटनांना पुन्हा आवाहन करुन 'डाऊ' विरोधाप्रमाणे मोठे विद्रोही जनआंदोलन, जेल भरो आंदोलन आम्हांला करावे लागेल. याला सर्वथा शासन जबाबदार राहील व साऱ्या जगासमोर या संघर्षाचा पंचनामा होईल याची शासनाने गांभीर्याने नोंद घेवून खालील मागण्यांची त्वरीत पूर्तता करावी व या संघर्षाला विराम द्यावा.

१) शासनाने संत तुकोबांच्या या तपोभूमी डोंगरातील प्राचीन लेणी गुहा मंदिरातील एकांतप्रिय ध्यान-साधनेची परंपरा जपावी. जगभरातून येथे येणा-या अध्यात्मिक साधकांना साधनेसाठी हे दोन्ही डोंगर संपूर्णपणे पायथा परिसरासह 'राज्य सरंक्षित स्मारक' म्हणून सन २०११ ला शासन अधिसूचनेनुसार 'जसेच्या तसे (नवीन प्राथमिक व अंतिम अधिसूचने मध्येही) कायमस्वरुपी' शांतीपूर्ण अवस्थेत ठेवावेत.

२) भंडारा - भामचंद्र डोंगर व पुढे १०० मी. सरंक्षित व ३०० मी. विनियमित क्षेत्रातील अनधिकृत झालेले बांधकाम त्वरित हटवून महाराष्ट्रासह विश्वभरातून देहू आळंदी प्रस्थान सोहळ्यानिमित्त प्रतिवर्षी लाखोंच्या संख्येत येणाऱ्या वारकरी व भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता त्यांना तंबू व राहुटी तसेच भजन संकीर्तन कार्यक्रमासाठी येथील संरक्षित क्षेत्र राखीव ठेवावे तसेच विनियमीत क्षेत्रात संतवाङ्मय अध्ययन संशोधनासाठी "संत तुकाराम महाराज विश्व विद्यापीठाची"स्थापना करावी. यासाठी संरक्षित, विनियमीत व डोंगर क्षेत्रातील खाजगी जागेचा मोबदला देऊन ती संपादित करावी. हजारो हेक्टर जमीन औद्यागिकीकरणासाठी येथे संपादीली जाते. मग संतसंस्कृती जतन संवर्धन विकासासाठी जमीन का संपादित होत नाही ? संत तुकोबांनी समता प्रस्थापित केली म्हणून त्यांचा वारसा शासनाला संपवायचा आहे का ?

३) भंडारा व भामचंद्र डोंगरातील शिवस्थापीत संत तुकोबांचे चरण पादुका मंदिर, ज्यावर ब्रिटीशांनी **Home of joy** लिहले होते तत्कालीन धर्मशाळा, चिंतन मंडप व प्राचीन शिव मंदिर नष्ट करणारे तसेच संरक्षित व विनियमीत क्षेत्रात अवैध खोदकाम, सपाटीकरण व बांधकामास जबाबदार असणाऱ्या शासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या सन १९६० च्या अधिनियमावलीचा भंग करणाऱ्या येथील सर्वांवर कायदेशीर कारवाई करावी व या तपोभूमी डोंगराचा तोडलेला पायथा व पाडलेले प्राचीन सर्व वास्तूंचे बांधकाम पूर्ववत करावे.

४) श्रीक्षेत्र भंडारा, भामचंद्र, घोऱ्हाडेश्वर या तपोभूमी पर्वतांच्या सभोवती संरक्षित व विनियमीत क्षेत्र सिमेवर भक्कम तटबंदी भिंत बांधून येथील वनश्री पर्यावरण, जैवविविधता, सर्वधर्म समन्वयाचा लेणी वारसा, प्राचीन इतिहास व येथील अध्यात्मिक निरामय शांतता जतनासाठी कायमस्वरूपी शासकीय संरक्षक नेमावेत जेणेकरुन या ध्यानसाधना भूमीला बाधा व भविष्यात अतिक्रमण होणार नाही.

५) सन २००८-०९ मध्ये ही पुण्यभूमी वाचविण्यासाठी 'डाऊ' विरोधी झालेल्या आंदोलकांवरील खटले शासनाने आश्वासन देऊन अजूनही काढून घेतलेले नाहीत ते त्वरित काढावेत व श्रीक्षेत्र भामचंद्र, भंडारा, घोऱ्हाडेश्वर डोंगर तपोभूमीच्या संरक्षणासाठी सरळ मार्गाने चालणाऱ्या वारकऱ्यांना पुन्हा विद्रोही आंदोलन करण्याला शासनाने भाग पाडू नये.

अशाप्रकारे निवेदनानुसार वरील पाच प्रमुख मागण्या आज दि.   /   /२०१   रोजी आम्हीं समस्त ----------------- ग्रामस्थ, ग्रामपंचायत - ग्रामसभा ठरावाद्वारे एकमताने मंजूर करीत असून त्याची पूर्तता व अंमलबजावणी लवकरात लवकर करणेसाठी माननिय धर्मराजेश्वर मुख्यमंत्री महोदयांनी शासनाच्या संबंधित विभागांना कार्यवाहीसाठी तातडीने आदेश द्यावेत ही विनंती.